ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8484. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २५ सप्टेंबर, १९५७ | अंक ३९

## विविध माहिती

**भारतानें परत केलेली चांदी**—भारतानें युद्धकाळांत अमेरिकेकडून चांदी उसनी घेतली होती. अमेरिकेला भारताकडून एकूण १७·२५ कोटी औंस चांदी परत मिळावयाची आहे. त्यापैकी ४·९१ कोटी औंस चांदी कांबींच्या रूपांत परत करण्यांत आली आहे, अशी माहिती लोकसभेंत अर्थमंत्री श्री. कृष्णाम्माचारी ह्यांनीं सांगितली. त्याशिवाय चांदीच्या नाण्यांच्या स्वरूपांत असलेली कांहीं चांदीहि परत करण्यांत आली आहे.

**वाहतुकीचा जादा खर्च**—सुएझचा कालवा वाहतुकीला बंद झाल्यावर सागरी वहातुक कंपन्यांनीं आपल्या दरांत वाढ केली होती. आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाला वळसा घालून बोटी येत होत्या. बोटींना लांबचा प्रवास करावा लागत असल्यामुळें कालवा बंद असण्याच्या कालांत भारताला वहातुकीसाठी १० ते १२ कोटी रुपये अधिक द्यावे लागले अशी माहिती लोकसभेंत अर्थमंत्र्यांनीं सांगितली.

**रबराच्या निर्यातीवरील निर्बंध**—मलायाच्या नव्या स्वतंत्र सरकारनें असें जाहीर केलें आहे कीं, रबराच्या निर्यातीवर असणारे निर्बंध संपूर्णपणें रद्द करण्यांत आले असून रशिआ व चीन ह्यांनाहि खुल्या बाजारांत रबराची खरेदी करतां येईल. रबराचा व्यापार पूर्वीप्रमाणेंच खाजगी धंदेवाल्यांच्यामार्फत चालणार आहे.

**भारतीय बोलपटाची लोकप्रियता**—भारतांत तयार झालेला 'आवारा' हा बोलपट अल्बानिआमध्यें अतिशय लोकप्रिय झाला आहे. त्या चित्रपटांतील दुःखभावना व्यक्त करणारें एक गाणें तर फारच लोकप्रिय झालें असून ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें आहे. 'आवारा' बोलपटाचें कथानक एका उडाणटप्पूच्या जीवनावर आधारलेलें आहे.

**सहकारी साखर कारखाना**—रायचूर जिल्ह्यांतील गंगावती ह्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्याची खटपट चालू आहे. गंगावतीच्या आसपासच्या भागांत तुंगभद्रा धरणामुळें पाणीपुरवठ्याची चांगली सोय झाली आहे. त्याचा फायदा घेऊन १५,००० एकर जमीन उसाच्या पिकासाठीं राखून ठेवण्यांत येणार आहे.

**नव्या धरणाचें उद्घाटन**—केरळमधील त्रिचूर शहरापासून १० मैलांवर बांधण्यांत आलेल्या पाणी-पुरवठ्याच्या धरणाचें काम पूर्ण झालें आहे. त्याचें उद्घाटन २ ऑक्टोबरला राज्याचे गव्हर्नर श्री. रामकृष्णराव ह्यांच्या हस्तें होणार आहे. धरणासाठी २·५ कोटी रुपये खर्च आला. त्यामधील पाण्यानें ५०,००० एकर जमिनीला पाणी मिळेल.

**आसामशीं संबंध जोडणारा दुसरा रेल्वेमार्ग**—सध्यां आसामचा भारताशीं संबंध जोडणारा एकच रेल्वेमार्ग आहे. आसाममध्यें अतिवृष्टि होऊन पूर आल्यास हा मार्ग धोक्याचा व अनिश्चित होतो. म्हणून त्या राज्याशीं असलेलें दळणवळण चालू ठेवण्याच्या दृष्टीनें भारताचें रेल्वेबोर्ड आणखी एक पर्यायी मार्ग बांधणार आहे. ह्या मार्गाची प्राथमिक पहाणी सध्यां चालू असून ती पूर्ण झाल्यावर लवकरच बांधकाम हातीं घेण्यांत येणार आहे.

**चीन-पश्चिम जर्मनी व्यापार**—पश्चिम जर्मनीचे व्यापारी प्रतिनिधी व चीनचे प्रतिनिधी ह्यांच्या दरम्यान सध्यां पेकिंग येथें व्यापारी वाटाघाटी चालू आहेत. उभयतां देशांत व्यापारी करार करण्यांत येऊन ४ कोटी पौंडांच्या देवघेवीचा करार होईल असा अंदाज चीनच्या प्रतिनिधींनीं व्यक्त केला आहे. चीन दोन कोटी पौंड किंमतीचा माल आयात करील व तितक्याच किंमतीचा निर्यात करील.

**स्टेशनांवर विजेची सोय**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या तीन वर्षांत भारतामधील ४७५ रेल्वे स्टेशनांत विजेच्या प्रकाशाची सोय करण्यांत येणार आहे. ज्या ठिकाणीं वीज वाजवी दरानें मिळूं शकेल तेथेंच तसें करण्यांत येणार आहे. १९५६–५७ सालीं १४१ स्टेशनांवर वीज घेण्यांत आली. १९५७–५८ सालीं १८८ व त्या पुढच्या वर्षी १४६ स्टेशनांवर वीज घेण्यांत येणार आहे.

**रशिअन तज्ज्ञांचा दौरा**—भारतामधील शास्त्रीय संशोधन-संस्था पहाण्यासाठी चार रशिअन तज्ज्ञ सध्यां दौरा करीत आहेत. ते वंगणाच्या तेलाबाबतचे तज्ज्ञ असून मध्यवर्ती सरकारच्या आमंत्रणावरून आले आहेत. हैदराबाद येथील प्रागा टूल्स कॉर्पोरेशनला भेट दिल्यानंतर ते विशाखापट्टम येथील काल्टेक्स कंपनीच्या तेलशुद्धीचा कारखाना पहाण्यास गेले.

**औद्योगिक शांततेचा करार**—निझाम शुगर फॅक्टरीचे चालक आणि कारखान्यांतील मजुरांची संघटना ह्यांच्यांत करार करण्यांत आला असून ४ वर्षेपर्यंत औद्योगिक शांतता राखण्याचें उभय पक्षांनीं मान्य केलें आहे. मजुरांना पगारांत वाढ देण्यांत आली आहे. हा कारखाना आशिआंतील सर्वांत मोठ्या कारखान्यांपैकी आहे. त्यांत १०,००० मजूर काम करतात.

**म्हैसूर राज्यांतील खनिज संपत्ति**—म्हैसूर राज्याचे उद्योगमंत्री नागपूर भागांतील कोळशाच्या इतर खाणींची पहाणी करण्यासाठी गेले होते. म्हैसूर राज्यांतील खनिज संपत्तीचा शोध लावून तिचा अधिक उपयोग करून घेण्यासाठी राज्य-सरकार लवकरच एक बोर्ड नेमणार आहे, अशी माहिती त्यांना नागपूर येथील कर्नाटक संघापुढें बोलतांना सांगितली.

## बँकर्सची येती परिषद

महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक बँकांची एक परिषद पुणें येथें येत्या नोव्हेंबरांत भरविण्यांत येण्याचें नक्की झालें आहे. ह्या परिषदेच्या कल्पनेस अपेक्षेप्रमाणें पाठिंबा मिळत आहे आणि सर्व महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या बँकर्सनीं आपल्या सहकार्याचें आश्वासन दिलें आहे. परिषदेंत चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांची बँकांना विशेष तीव्रतेनें जाणीव झालेली आहे आणि पुढील प्रगतीची दिशा ठरविण्यासाठी सहकार्यानें जाण्याची त्यांची वाढती तयारी आहे, हें दिसून येत आहे. स्वतःच्या अडचणी प्रगट करण्यास कोणताच बँकर सहाजिकच तयार होत नाहीं; पण इतरहि बँकर्सना त्याच अडचणी भासत आहेत ही जाणीव सर्वांना एकत्र आणूं शकते आणि परस्पर-विश्वास आणि सहकार्य हीं वृद्धिंगत होतात. सर्वांच्या समान प्रश्नांना तोंड फोडतां येऊन योग्य त्या ठिकाणीं त्यांची दाद लावून घेणें त्यामुळें सुकर होतें. त्यांत सर्वांचाच फायदा असतो. बँकर्सच्या परस्पर-परिचयाची संधि अशा परिषदेमुळें उपलब्ध होते, तीहि बँकिंगच्या व्यवसायाच्या प्रगतीस पोषकच होते. ह्या सर्व दृष्टींनीं आम्हीं ह्या परिषदेचें स्वागत करतों.

---

धी बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येते कीं, ह्या बँकेची ४६ वी वार्षिक साधारण सभा शनिवार दिनांक १९ ऑक्टोबर १९५७ रोजीं दुपारीं २ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई, ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५७ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा वांटणीचा दर जाहीर करणें.

३. पोटनियम नं. ४७ (अ) (1), (अ) (2), (ब) (i), (ब) (ii), (ई), (एफ) (1), (एफ) (2) व (एच्) प्रमाणें निवडलेल्या व नेमणूक झालेल्या डायरेक्टर्सचीं नांवें जाहीर करणें.

४. हिशेबतपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

५. पोटनियम ४७ (२) खालील प्रमाणें जादा घालणें.

"47 (2). For the purposes of the first election under Bye-law 47 (D), the urban banks shall be given time till 30th November 1957 to contribute to the share capital of this Bank in order to acquire the required qualification in respect of their contribution to the share capital of this Bank. Until the first elections under Bye-law 47 (D) are held, the retiring Directors representing the present constituency of urban banks shall continue to hold office."

मुंबई. २०-९-५७ — संचालक मंडळाच्या हुकमावरून, वाय्. बी. गायतोंडे, मॅनेजर.

---

भागाच्या तबदिलाचें काम ( ट्रान्सफर बुकें ) ता. ८-१०-५७ ते २६-१०-५७ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.


डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तारीख ५-१०-५७ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना शुक्रवार ता. १-११-५७ पासून मुंबई ऑफिसमधून त्यांची रक्कम दिली जाईल.

कृष्ण आणि कृष्ण व पुढे फाऊल
ह्या लोकप्रिय व सर्वमान्य पुस्तकांचे लेखक
श्री. वा. काळे
( संपादक, "अर्थ", पुणें ४ )
ह्यांचें नवें पुस्तक
तुमचें स्थान कोणतें ?
हें येत्या दिवाळीचे आधीं प्रसिद्ध होईल.
पृ. सं. सुमारें १२०. ★ किंमत २ रुपये.
कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांची मनमोकळी चर्चा ह्या पुस्तकांत वाचण्यास मिळेल. इष्टमित्रांना श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांच्या देणगीनें आपली रसिकता व्यक्त करा !

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— वृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक रच्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २५ सप्टेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्याचें उत्पन्न व लोकसंख्या

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेनें आपला १९५६–५७ सालचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. संघटनेचे अध्यक्ष भारताचे श्री. विनयरंजन सेन ह्यांनीं अहवालाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत असें म्हटलें आहे कीं, अहवालाच्या सालीं करण्यांत आलेली प्रगति विशेष लक्षांत घेण्यासारखी नाहीं. अजून अन्नधान्याच्या उत्पादनाबाबत बरेंच अंतर कापावयाचें आहे. अहवालांत ग्रथित करण्यांत आलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं १९५६–५७ ह्या सालीं लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें जगांतील शेतीचें उत्पादन कांकणभर पुढें होतें. ह्याचा अर्थ सर्व लोकांना भरपूर खावयास मिळत आहे असा मात्र नाहीं. परंतु दुष्काळाची भीति थोड्याफार प्रमाणांत मागें सरली, इतकेंच. ह्या सालीं जगांतील अन्नाचें उत्पादन ३ टक्क्यांनीं वाढलें व लोकसंख्या १·६ टक्क्यांनीं वाढली. जगांत जे अविकसित भाग आहेत त्यामधील उत्पादनाच्या वाढीचा वेग १९५२ सालापासूनच्या जगांतील वाढीच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. उलटपक्षी विकसित भागांतील उत्पादनाच्या वाढीचा वेग जरा कमी असल्याचें आढळून आलें. अविकसित देशांत पांच वर्षांपूर्वी उत्पादनाचीं जीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं होतीं तीं चारच वर्षांत गांठण्यांत आलीं. अतिपूर्वेकडील भागांत तर उत्पादनाच्या ठरलेल्या उद्दिष्टांपेक्षाहि बरीच अधिक मजल मारण्यांत आली. आफ्रिका व इतर कांहीं देश ह्यांच्यांतील उत्पादन अंदाज केल्याप्रमाणें वाढलें. दक्षिण अमेरिकेंतील देशांत मात्र उत्पादनाच्या उद्दिष्टांपेक्षा प्रत्यक्ष उत्पादन बऱ्याच प्रमाणांत मागें रेंगाळलें. पण ह्या भागांतील उद्दिष्टेंच फार मोठीं ठेवण्यांत आलीं होतीं. तरीपण ह्या उत्पादनाचा वेग जागतिक सरासरीपेक्षा अधिक होता.

अहवालांत कम्युनिस्ट देशांतील सरकारांनीं अधिकृत रीत्या पुरवलेल्या माहितीच्या आधारें त्या देशांतील अन्न व शेती-विषयींची माहिती प्रथमच देण्यांत आली आहे. अन्नधान्याचें उत्पादन सोव्हिएट रशिआंत २० टक्क्यांनीं वाढलें. रशिआ सोडून पूर्व युरोपांतील इतर देशांतील अन्नधान्याचें उत्पादन १० टक्क्यांनीं घटलें. चीनमधील अन्नधान्याचें उत्पादन ५ ते ६ टक्क्यांनीं वाढलें. १९५४ मध्यें रशियन सरकारनें आपल्या पूर्वेकडील प्रदेशांत असलेल्या पडीक पण लागवडीस योग्य असलेल्या जमिनी प्रथमच नांगराखाली आणण्याचें ठरविलें, व ह्या धोरणास अनुसरून नव्या शेती–वसाहती स्थापण्यास आरंभ केला. तेंव्हांपासून रशिआंतील धान्याच्या उत्पादनाचें मुख्य केंद्र पूर्वेकडे सरकूं लागलें. ह्यापूर्वी पश्चिम रशिआंतील युक्रेन हा भाग अन्नधान्याच्या उत्पादनाच्या आघाडीवर होता. पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट राष्ट्रांतील लोकांनीं दडपण आणल्यामुळें त्या देशांतील शेतीच्या उत्पादनांत व त्याच्या वितरणांत बरेच महत्त्वाचे फरक झाल्याचें दिसतें. पूर्व युरोपांतील बहुतेक सर्व देशांतून शेतीचें सामुदायिक शेतींत रूपांतर करण्याची जी लाट उसळली होती ती ग्रामीण भागांतील जनतेच्या विरोधामुळें विरून गेल्याचें दिसतें. चीनच्या सरकारनें चालू वर्षी प्रमुख अन्नधान्याचें उत्पादन २०·८ कोटी टनांपर्यंत वाढविण्याची उमेद धरली आहे. १९६७ सालपर्यंत चीनमधील धान्याचें उत्पादन ४० कोटी टनापर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे. जगांतील साखरेचा खप उत्पादनाच्या मानानें अधिक झाल्यानें साखरेचा सांठा कमी झाला आणि किंमती दुपटीनें वाढल्या. दूधदुभत्याच्या उत्पादनांत वाढ झाली पण ती दुभत्या जनावरांच्या संख्येंतील वाढीमुळें झाली नसून दुधाचें दर जनावरी उत्पादन वाढल्यामुळें झाली.

---

## विणकरांसाठी अधिक घरांची सोय

भारत सरकारनें विणकरांची रहाण्याची सोय करण्यासाठी आतांपर्यंत १८ वसाहतींच्या योजना मंजूर केल्या आहेत. मद्रास व ओरिसा राज्यांत नुकत्याच मंजूर करण्यांत आलेल्या तीन योजना त्यांत धरलेल्या आहेत. आंध्र प्रदेश, मद्रास, म्हैसूर, केरळ, मुंबई, उत्तर प्रदेश आणि ओरिसा इतक्या राज्यांतून त्या पसरलेल्या आहेत. नव्या वसाहतीमधील रहाण्याचीं घरें सहकारी तत्त्वावर बांधण्यांत येणार असून त्यांचा उपयोग कामासाठीहि करण्यांत येणार आहे. जीं कामें मोठ्या प्रमाणावर केलीं तर अधिक चांगलीं होतात, अशा प्रकारचीं वस्त्रें रंगविण्यासारखीं कामें करण्यासाठी स्वतंत्र सोय करण्यांत येणार आहे. वसाहतीच्या मालक असलेल्या सहकारी संघटनाच विणकरांसाठी सुताची खरेदी करणें आणि त्यांना सुताचा पुरवठा करणें हीं कामें करणार आहे. त्याचप्रमाणें, तयार मालाच्या विक्रीचीहि व्यवस्था संघटनेमार्फत करण्यांत येणार आहे. ओरिसामधील दोन वसाहतींत प्रत्येकीं ९० घरें असतील. मद्रासमधील वसाहतींत ५० घरें असतील. मद्रासमधील वसाहतींत बांधण्यांत येणाऱ्या घरांची जास्तींत जास्त प्रत्येकी किंमत ३,६०० ठरविण्यांत आली असून ओरिसामधील घराची प्रत्येकी किंमत ३,१६० रुपये ठरविण्यांत आली आहे. घराच्या किंमतीपैकी एक तृतीआंश रक्कम मदत म्हणून देण्यांत येणार असून उरलेली रक्कम २५ वर्षें मुदतीचें कर्ज म्हणून मानण्यांत येणार आहे. मद्रासमधील वसाहतीला ७१,००० रुपयांचें कर्ज देण्यांत येणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग रस्त्यांच्या बांधणीसाठी व पाणीपुरवठ्याची सोय करण्यासाठी होणार आहे. मद्रास व ओरिसाच्या राज्य सरकारांना वसाहतींच्या योजनांसाठी अनुक्रमें ६४,९०० रुपये व ६३,२०० रुपये अशा रकमा मंजूर करण्यांत आल्या आहेत.

---

## बँक ऑफ् कराड लि.

ह्या बँकेनें शहराचे मध्यवस्तींत मुख्य रस्त्यावर जागा खरेदी केली असून त्यावर बँकेच्या इमारतीचें बांधकाम सुरू आहे. नवीन इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय होणार आहे. येत्या चैत्र पाढव्यास बँक आपले व्यवहार स्वतःचे मालकीच्या इमारतींत सुरू करील.

## ब्रिटिश बँकरेटमध्यें वाढ

### भारतावरील संभाव्य परिणाम

ब्रिटिश सरकारनें १९ सप्टेंबर रोजीं बँकरेट २% नें वाढवून तो ७% केला. किंमती आटोक्यांत राखून पौंडाचा बचाव करण्याचा हा प्रयत्न आहे. येत्या वर्षांत बँकांकडून किती कर्जे मिळावींत, त्याची कमाल मर्यादा गेल्या १२ महिन्यांतील सरासरी रकमेइतकी ठरवून देण्यांत आली आहे. सरकारी खात्यांनीं व राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगांनीं करावयाच्या खर्चास कात्री लावण्यांत आली आहे. बँकरेटमधील ह्या प्रचंड वाढीनें व्यापारी वर्गास चांगलाच हादरा दिला आहे. " वाढत्या महागाईसाठी लागणारा पैसा सरकार पुरवीत राहील, तोंवर चलनवाढ होत रहाणार आणि किंमती चढत जाणार, हें उघड आहे. चलनाची किंमत टिकून रहावयाची असेल, तर आपल्या उत्पादनाच्या मानानें जास्त खर्च करून किंवा अधिक चांगली रहाणी ठेवून कधींच चालणार नाहीं." असें ब्रिटिश अर्थमंत्रि, मि. पीटर थॉर्निक्रॉफ्ट ह्यांनीं निक्षून सांगितलें आहे. १ पौंड = २ डॉलर, ८० सेंट हा हुंडणावळीचा दर टिकविण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न आहे; आज पौंडाची किंमत घसरूं लागलेली आहे आणि ब्रिटनची व डॉलरमधील शिलकांची पुंजी कमी कमी होत चालली आहे. बँकरेट वाढल्यामुळें बँकांकडून कर्जे मिळणें अवघड व महाग होणार आणि लहान कारखानदार व व्यापारी ह्यांची अडचण वाढणार, हें उघड आहे.

१९१४ सालीं ब्रिटिश बँकरेट एका दिवशीं ४% वरून एकदम ८% वर नेण्यांत आला होता व दुसऱ्या दिवशीं तो १०% करण्यांत आला होता. १९३९ मध्यें बँकरेट २% चा ४% केला होता. हे दोन प्रसंग सोडले, तर ब्रिटिश बँकरेट एकदम २% नें ह्यापूर्वी कधींहि वाढविण्यांत आला नव्हता. वरील दोन्ही प्रसंग युद्धप्रारंभाचे होते, त्यावरून सध्यांची आर्थिक परिस्थिति ब्रिटिश सरकारला तशीच आणीबाणीची वाटत आहे, हें स्पष्ट आहे. बँकरेटच्या वाढीमुळें परदेशांतील पैसा लंडनकडे आकर्षिला जाईल, अशी अपेक्षा आहे. परंतु ह्या परदेशी पैशाला भारी किंमत देणें ब्रिटिश सरकारला व जनतेला किती काळ परवडेल हा प्रश्नच आहे. पश्चिम जर्मनींत सध्यां आर्थिक व औद्योगिक चलती असून, तेथील बँकरेट १८ सप्टेंबर रोजींच अर्ध्या टक्क्यानें उतरविण्यांत आला आहे. जर्मन मार्क तेजींत आहे व तो मिळविण्यासाठी ब्रिटिश पौंड देणारे सट्टेबाज लोक पौंडाची किंमत घसरवण्यास कारणीभूत होत आहेत, असें म्हटलें जात आहे.

ब्रिटिश बँकरेटच्या वाढीचा परिणाम भारतावरहि झाल्याविना रहाणार नाहीं. एक्सचेंज बँकांच्या उलाढाली आतां वाढतील. त्या बँकांना त्यांच्या इंग्लंडमधील कर्जावर जास्त दरानें व्याज भरावें लागेल, त्या बँका येथें ठेवी मिळविण्यासाठी अधिक तीव्र स्पर्धा करूं लागतील. येता मोसम सुरू होण्यापूर्वीच, बँकांनीं कर्जे आखडतीं घेण्याचा सल्ला त्यांना रिझर्व्ह बँकेनें दिला आहे. बँकरेट वाढविण्याची रिझर्व्ह बँकेला आवश्यकता वाटेल किंवा नाहीं, हें इतक्यातच सांगतां येणार नाहीं; तरी पण तंगीमध्यें भर पडणार हें निश्चित. परदेशांतून मिळावयाच्या मदतीस व कर्जास अडचण भासत आहे, त्या अडचणींत आतां भरच पडण्याचा रंग दिसतो.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## सारस्वत को. बँकेचीं वैशिष्ट्यें

अध्यक्ष : वामन पुंडलिक वर्दे, बी. कॉम., एफ्. आय. बी. (लंडन)

उपाध्यक्ष : गोविंद मंगेश लाड, बी. कॉम.

चिटणीस : शंभु विनायक संझगिरी, बी. कॉम.

(१) वर्षअखेर पटावर असलेल्या ४,६१२ सभासदांपैकीं ८९० महिला आहेत.

(२) बँक गेलीं ३५ वर्षे सतत ६¼% डिव्हिडंड देत असूनहि ५ अगर कमी शेअर असलेल्या सभासदांची संख्या ७०% आहे.

(३) बँकेकडील रिझर्व्ह (७,९१,५३३ रु.) बँकेच्या शेअर भांडवलापेक्षां (७,७५,७४० रु.) १५,७९३ रु. नीं अधिक आहे.

(४) ठेवींपैकीं ५५·३७% रक्कम बिगर–सभासदांची आहे.

(५) सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवीदारांना त्यांना वर्षअखेर मिळालेल्या व्याजावर २५% बोनस देण्यांत आला.

(६) कर्जासाठी आलेल्या ७४५ अर्जांपैकीं २३१ कर्जे ५०० रु. खालील होतीं.

(७) येणें कर्जाच्या रकमेचें ठेवींशीं ३१·०५% व खेळत्या भांडवलाशीं २७·९२% प्रमाण पडतें.

(८) एकूण कर्जापैकीं फक्त ७% कर्ज वैयक्तिक तारणावर आहे; बाकी सर्वाला भक्कम तारण आहे.

(९) सूट लक्षांत घेतां वैयक्तिक तारणाच्या लहान कर्जदारांना व्याजाचा दर फक्त २% पडतो.

(१०) ठेवींवरील व्याजाचे दर ½% ते ४% आणि कर्जांवरील व्याजाचे दर कारण व तारण ह्यानुसार २ ते ६½% आहेत.

(११) वरळी (मुंबई) येथील रहिवाशांच्या सोईसाठी लौकरच शाखा उघडण्यांत येईल. बँकेच्या फोर्ट, दादर, माहीम, पुणें व बेळगांव येथें शाखा आहेत.

(१२) इमारतींचा खर्च वजा जातां मिळालेलें उत्पन्न बिल्डिंग फंडांत जमा करण्यांत येतें. बिल्डिंग फंड आतां इमारतींच्या किंमतींच्या ५८% आहे.

(१३) महिला शाखा व इलेक्ट्रिक सप्लाय बिलें स्वीकारण्याची माहीम शाखेंत सोय, हे बँकेचे नवे उपक्रम आहेत.

(१४) बँकेच्या अधिकारी वर्गांत १० बी. कॉम असून त्यांतील २ सी. ए. आय. आय. बी. व २ एच. डी. सी. आहेत.

(१५) बँकेनें निव्वळ नफ्यांतून केलेल्या धर्मादाय फंडांतून ५,८५० रु. च्या देणग्या १९५६–५७ मध्यें दिल्या.

(१६) बँकेचें खेळतें भांडवल १ कोटि, ८० लक्ष रु. झालें असून नफा ९४ हजारांपर्यंत गेला आहे.

स्थापना १९१८ टेलिफोन २७०७४
जनता बचत योजना
व्याज २॥ टक्के
सविस्तर माहितीकरितां आजच आमच्या मुख्य अगर शाखा कचेरीस भेट द्या.
सारस्वत को ऑपरेटिव्ह बँक लि.
निकदवरी लेन, गिरगांव, मुंबई ४.
शाखा - फोर्ट • दादर • माहिम • पुणें • बेळगांव

## कूळकायद्याचे लँड मॉर्गेज बँकांवर परिणाम

### कर्जदारांनीं वेळींच सावध व्हावें !

(श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव, चेअरमन, दि ठाणा, कुलाबा अँड सबरबन डिस्ट्रिक्टस को. लँड मॉर्गेज बँक लि., कल्याण)

जे शेतकरी स्वतः जमीन न कसतां कुळाकरवीं कसतात त्यांना कुळाकडून खंड मिळणें जवळ जवळ अशक्यप्राय झाल्यामुळें, अशा [ Absentee Landlords ] कर्जदारांकडून बँकेच्या कर्जाची मुळींच फेड होत नाहीं, हें येथें कष्टानें नमूद करणें भाग पडत आहे.

ता. १-४-५७ पासून सुधारलेल्या कुळकायद्याची अंमलबजावणी सुरू झाली व जो शेतकरी ज्या जमिनीची लागवड करीत होता ती जमीन घेण्याचा हक्क त्याला मिळाला आहे. या संधीचा खराखुरा फायदा घेतां यावा. म्हणून शेतकऱ्यांची जास्तींत जास्त गरज पुरविण्याची बँक तजवीज करीत आहे. तरी शेतकऱ्यांनींहि त्याचा फायदा घ्यावा. सुधारलेल्या कूळकायद्याचें कलम ६४ (७) प्रमाणें कुळानें विकत घेण्याची जमीन त्यास जमीनदारांकडून दोघांचे विचारानें धाऱ्याचे २० पटींपेक्षा कमी नाहीं व २०० पटींपेक्षा जास्त नाहीं अशा किंमतीस ठरवून घेण्याची सवलत दिली आहे. त्या सवलतींचा उपयोग करून घेतल्यास कसणारास ती जमीन तावडतोब त्याचे संपूर्ण मालकीची करून घेतां येईल. सुधारलेल्या कूळकायद्यान्वयें ता. १-४-५७ रोजीं कुळास जमीन विकत घेण्याचा हक्क प्राप्त झाला. ती जमीन त्याचे पूर्ण मालकी हक्काची होण्यास त्यानें हप्त्यांची संपूर्ण फेड केल्यानंतर म्हणजे सुमारें १२ ते १६ वर्षें लागतील. तोंपर्यंत सोसायटीकडून लहान मुदतीचे कर्जाशिवाय मध्यम अगर लांब मुदतीचें कर्ज त्यास मिळेल किंवा नाहीं याची शंका वाटते. तसेंच जमिनीचा मालकी हक्क संपूर्णपणें प्राप्त होईपर्यंत त्या जमिनीची त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास अगर त्याचे वारसास विल्हेवाट लावतां येण्याची शक्यता नाहीं. म्हणून शेतकऱ्यांनीं जमिनी त्यांच्या पूर्ण मालकी हक्काच्या होण्याकरितां बँकेची जरूर ती मदत घ्यावी.

तसेंच बँकेनें तिच्या कर्जदारांना जुन्या कर्जफेडीसाठी द. सा. द. शें. ७½ टक्के व्याजाचे दरानें कर्जें दिलीं असून ती रक्कम थकल्यास भाडेपट्ट्यांतील कराराप्रमाणें थकबाकीवर द. सा. द. शें. ९¾ दरानें व्याज घेतलें जातें. परंतु ज्या जमिनी कूळकायद्याप्रमाणें कुळाचे नांवें वर्ग होत आहेत, त्या बाबतींत जमिनीच्या विक्रीची जी रक्कम ठरेल तीवर त्या कुळाकडून फक्त ४½ टक्के दरानेंच व्याज मिळणार आहे. तात्पर्य, यामुळें बँकेच्या सभासद कर्जदारांना बरेंच नुकसान सोसावें लागणार आहे. तरी त्यांनीं वेळींच सावध होऊन सरकारकडून या प्रश्नाचा फेरविचार करून घ्यावा व शक्य तेवढ्या लवकर कुळांकडून रोख रक्कम घेऊन जमिनी त्यांना कायमच्या देऊन टाकाव्या.

कूळकायद्यामुळें लँड मॉर्गेज बँकेचे कामकाजांत बरेच गुंतागुंतीचे व कायदेशीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. बँकेनें तिच्या कर्जदारांना त्यांच्या जमिनी कबजे गहाण घेऊन कर्जें दिलीं असून त्या जमिनी बँकेचे कूळ या नात्यानें मूळ कर्जदाराकडे कसण्यासाठी भाडेपट्ट्यानें दिल्या आहेत. म्हणजे आज त्या जमिनी कूळ या नात्यानें त्यांचे वहिवाटीस आहेत. परंतु या कूळकायद्यामुळें ता. १-४-५७ पासून त्या हल्लीं कर्जदारांनीं ज्या इसमांना आपलें कूळ म्हणून प्रत्यक्ष लागवडीस दिल्या आहेत त्यांना सरकारकडून टेनन्सी ॲक्टचे कार्यपद्धतीनुसार विकत दिल्या जात आहेत. याचा अर्थ असा कीं, आज बँकेच्या कुळांकडे असलेल्या जमिनी त्या कुळांच्या पोट-कुळांकडे वर्ग होत आहेत. वस्तुतः अशा जमिनी गहाणांतून सोडविण्याचा कर्जदार सभासदांचा म्हणजे बँकेला भाडेपट्टा लिहून दिलेल्या कुळांचा हक्क राहात आहे व तोच हक्क त्याचे पोटकुळांना विकत घेतां येईल. या बाबतींत बँकेच्या अशा कर्जदार सभासदांनीं वेळींच जागरूक राहून हा प्रश्न कायदेशीरपणें सोडवून घेतला पाहिजे. त्यांनीं तांतडीनें हा प्रश्न हातीं घेतला नाहीं, तर परिणामीं त्यांचें अपरिमित नुकसान होण्याचा संभव आहे.

---

## शेतकरी सहकारी संघ, लिमिटेड, कोल्हापूर

अध्यक्ष : स. ल. बेनाडीकर, क्षात्रजगद्गुरु महाराज
मॅनेजिंग डायरेक्टर : तात्यासाहेब गो. मोहिते

शेतकऱ्यांनीं तयार केलेल्या मालाची विक्री करणें व उत्पादनासाठी त्यांना लागणाऱ्या चांगल्या प्रतीच्या मालाचा पुरवठा योग्य दरांत व वेळेवर करणें या ध्येयानें काम करीत असतांना संस्थेनें सभासदांनीं पिकविलेल्या मालापैकीं, गूळ, शेंग, तंबाकू वगैरेसारखा माल विक्री करून दिला, असून शेतकऱ्यांना लागणारीं सर्व रासायनिक खतें, इंजिनला व गृहोपयोगाकरतां लागणारीं सर्व तेलें, लोखंड व सीमेंट, कापड व नित्योपयोगी वस्तू आणि धान्य, साखर या मालाचा पुरवठा केला आहे.

कमींत कमी मोबदला घेऊन सभासदांची अधिकांत अधिक सोय करण्याचें ब्रीद राखूनहि संस्थेला चालू सालांत रु. ७,२०,६४,००० च्या व्यवहारांत सर्व खर्च वजा जातां रु. १,६४,१८४-३८ इतका नफा झाला आहे.

अहवाल सालांत साळवण, कासारवाडा, कागल, हळदी, आजरा, कुरुंदवाड, कुंभोज, इचकरंजी, रुकडी, मलकापूर, बाजारभोगांव, कोतोली, बालिंगे व आणाजे या ठिकाणीं नवीन शाखा उघडून संघानें आपल्या सभासदांची सोय केली.

सध्यांची परिस्थिति व औषधांच्या चढत्या किंमती लक्षांत घेऊन योग्य किंमतीस मिळणाऱ्या नित्योपयोगी औषधांचें दुकान उघडून सभासदांची उपयुक्त व निकडीची सोय करण्याचा संचालक मंडळानें संकल्प केला आहे.

शेतकरी सभासदांच्या जमिनींची रासायनिक परीक्षा करून निरनिराळ्या पिकांकरितां योग्य रसायनमिश्रित खतें वापरण्याकरतां एक रसायन शाळा व सल्लाकेंद्र उघडण्याचें संघानें ठरविलें आहे.

सभासद बंधूंनीं संघाच्या दुकानांमध्यें खरीदलेल्या मालाच्या किंमतीवर वार्षिक नफ्याचें प्रमाण पाहून रिबेट देण्याचें धोरणहि संचालक मंडळानें आंखलें आहे. आपण योग्य कामाकरतां खर्च केलेल्या रकमेचा कांहीं अंश पुन्हां आपल्याकडे परत करणाऱ्या या योजनेचें सभासद स्वागत करतील, अशी आशा आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

चेअरमन : रामचंद्र गोविंद परंडकर
मॅनेजर : विश्वनाथ एकनाथ रेडे

बँक स्थानेपासून 'अ' वर्गांत आहे. बँकेचा कारभार समाधानकारक असून प्रगतिपर आहे. अहवालाचे साली बँकेचे एकूण समासद १०७० आहेत. त्यांपैकी १०३ सहकारी सोसायट्या समासद आहेत व ९६७ व्यक्तिमात्र सभासद आहेत. याशिवाय नाममात्र सभासद ४३५ आहेत. वर्ष-सुरवातीस शेअर भांडवल रु. १,२१,५७० होतें. त्यांत रु. ७,६४० ची वाढ होऊन तें वर्ष अखेरीस रु. १,२९,२१० इतकें झालेलें आहे.

सरकारी कर्जरोख्यावरील व इतरत्राहि स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवीवरील व्याजाचे दर वाढते आहेत. याशिवाय स्थानिक मिल्स व बँका भारी व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारीत आहेत. तरी बँकेवरील विश्वास व आपुलकीमुळें बँकेकडील ठेवींत वाढ झालेली आहे. वर्ष सुरवातीस एकूण ठेवी रु. १८,००,१६५ होत्या. त्या वर्षअखेरीस एकूण रु. १९,१६,१३१ इतक्या आहेत.

सहकारी संस्था व शेतकरी वर्ग यांना पुरेसें वाजवी कर्ज देण्याचें सहकारी खात्याचें धोरणानुसार बँकेचा कर्जव्यवहार वाढत आहे. नवीन सोसायट्या स्थापन होत आहेत. त्यांच्या सभासदांच्या आर्थिक गरजा भागविणेकरितां बँकेनें भांडवल-पुरवठा केलेला आहे. गेलीं तीन वर्षें पीकपाणी समाधानकारक येत नसल्यामुळें सामान्यपणें कर्ज न घेणाऱ्या कांहीं शेतकरी-वर्गाला व सभासदांनाहि कर्जाची गरज भासूं लागली. त्यामुळें बँकेचे कर्जाचे व्यवहारांत वाढ झालेली आहे. याशिवाय सहकारी संस्थांना धान्य वांटपाचे कामाकरितां बँकेनें कर्जे दिलेलीं आहेत. सोसायट्यांना भरपूर कर्ज देण्याचें बँकेचें धोरण आहे. कांहीं सहकारी संस्था वसुलाचें काम योग्य रीतीनें करीत नाहींत व आपला कारभारहि चांगल्या रीतीनें चालवीत नाहींत. तसेंच सेल सोसायटींमार्फत माल विक्रीस पाठविणेविषयीं या बँकेनें वेळोवेळीं कळवूनहि सहकारी संस्था आपले समासदांचा माल विक्रीस पाठवीत नाहींत. यामुळें सहकारी संस्थांना व शेतकऱ्यांना यापुढें देण्यांत येणाऱ्या कर्जाचे बाबतींत सहकारी खात्याचे धोरणानुसार बँकेस जरूर ते शिस्तीचे इलाज करावे लागणार आहेत. यावर्षी सेल सोसायटीकडे वाढत्या प्रमाणांत माल विक्रीस आलेला आहे. पुढील वर्षी मोठ्या प्रमाणांत वाढ होईल अशी आशा आहे. बँकेच्या वैराग शाखेचा व्यवहार वाढता असून प्रगतीकारक आहे.

बार्शी तालुक्यांतील शेतकऱ्यांचें महत्त्वाचें पीक मुईमूग आहे. त्याचें बीं निकृष्ट दर्जाचें झालेलें आहे. सुधारलेलें व शुद्ध असें बीं परदेशाहून मिळणें शेतकऱ्यांस आवश्यक आहे. त्यावरच त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारणें व बँकेची व सोसायट्यांची कर्जवसुली मुख्यतः अवलंबून आहे. याकरितां वरीलप्रमाणें बीं मिळविण्याबाबत सरकारमार्फत प्रयत्न चालू असून हा उपक्रम शेतकऱ्यांना उपयुक्त व फलदायी ठरेल अशी खात्री आहे.

बँकेचा सर्व प्रकारचा व्यवहार वाढून प्रगति होत आहे. ठेवीदारांना शक्य तितकें व्याज देण्यांत येत आहे. कर्जावर शक्य तितके सवलतीचे व्याजाचे दर ठेवलेले आहेत. बँकेचे खर्चाचें प्रमाण काटकसरीचें आहे. खेळतें भांडवल व व्यवहार वाढतें असूनहि खर्चाचें प्रमाण १·६ हें कायम आहे व संस्थेच्या नफ्यामध्यें वाढ झालेली आहे. निव्वळ नफा १९,८९१ रु. झाला आहे.

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव, तालुका बेळगांव

चेअरमन : गजानन महादेवराव मातकांडे
सेक्रेटरी : प. के. सोमणाचे, डी. को.-ऑप.

अहवालसालीं नवीन समासद ८३ नें वाढलें असून एकूण समासद १५७९ आहेत. ता. ३०-६-१९५७ रोजीं बँकेच्या एकूण ठेवी रु. ५९८७९९·०१ इतक्या असून गतवर्षापेक्षा सुमारें पाऊणलाख रुपयांनीं ठेवी वाढलेल्या दिसताहेत. तसेंच शेअर भांडवल आणि रिझर्व्ह फंड यांत एकूण अनुक्रमें रु. ३१५५ आणि रु. ४४४० नी वाढ होऊन शेअर भांडवल रु. ६५,९७५ आणि रिझर्व्ह फंडस् रु. ५५,६७९·४८ चें झालें आहे. बँकेचें खेळतें भांडवल रु. ७,४६,०३३·२२ आहे. गतवर्षापेक्षा चालू सालीं खेळत्या भांडवलांत रु. ९०,००० ची वाढ झालेली दिसून येईल.

बँकेच्या कर्जव्यवहारांतसुद्धां वाढ झालेली असून, सामान्य कर्जे रु. २,२७,८४४, कॅश-क्रेडिट कर्जे रु. १५,४०३·७३ सोनें-चांदी तारणगहाण रु. ७७,४६५, मु. ठेव पावतीतारण रु. २६८५४ आणि गोडाऊन-मालतारण रु. ४३०० असें एकूण कर्जे रु. ३,५०,९६६·७३ आहे.

बँकेनें सरकारी कर्जरोखे आणि सरकारमान्य सिक्युरिटीजमध्यें एकूण रु. ३,०३,८४३·७५ इतकी गुंतविली आहे. त्यामुळें बँकेची आर्थिक दृढता अतिशय निकोप झाली आहे. ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय.

बँकेनें मुंबई, पुणें या ठिकाणीं खातीं उघडलीं असून व्यापारी बंधूंना याचा चांगला फायदा होत असल्याचें दिसून येतें. त्यामुळें ड्राफ्टस्, चेक्स, हुंड्या, बिल्स, रेल्वेरशिद वगैरेवरील रकमा वसूल करणेचें काम माफक कमिशनवर करण्यास सुलभ आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मोठ्या शेड्यूल्ड बँकांकडून देखील चेक्स, बिल्स, हुंड्या, रेल्वेरशिदी इत्यादींचीं वसुलीचीं बिलें बँकेकडे थेट पाठवितात. त्यामुळें बँकेमार्फत व्यवहार करणाऱ्या खातेदारांना याचा चांगला फायदा मिळत आहे. बँक 'अ' वर्गांत आहे.

---

### आंतर-बँक क्रिकेट ढालीचा बक्षिससमारंभ

श्री. बी. बी. पुरोहित ह्यांनीं ठेवलेली फिरती ढाल यंदाच्या पुणें आंतर-बँक सामन्यांत यशस्वी झालेल्या संघाला देण्याचा समारंभ श्री. प्रवीणचंद्र गांधी (मॅ. डायरेक्टर, देना बँक लि.) ह्यांच्या हस्तें रविवार दि. २९ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें सें. को. बँकेच्या सभागृहांत होणार आहे.

---

## दि मुरगूड सहकारी बँक लि., मुरगूड

चेअरमन : विश्वनाथराव हरिभाऊ पाटील
मॅनेजर : एच. बी. पाटील

वर्षअखेरीस सभासदसंख्या १४४७ इतकी आहे व 'ब' वर्गास सभासदसंख्या १६१० इतकी झाली आहे. शेअर भांडवल रु. १०००-०० नें वाढ होऊन तें १,१६,६७५ रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत या वर्षी एकूण रु. ५,८०६ नें वाढ होऊन एकूण फंडांची रक्कम रु. ६४,७०६ झाली आहे.

गेल्या वर्षी एकूण ठेवी रु. १,६२,६९८ च्या होत्या. अहवाल-सालअखेरीस एकूण ठेवी रु. २,१५,००९ असून गत वर्षापेक्षा रु. ५२,३११ नें ठेवींत वाढ झालेली आहे.

गेल्या वर्षी नफा ९,३११·७४ झालेला होता. तो या वर्षी रु. ११,०४५·४५ झालेला आहे. नफ्यांत रु. १,७३३·७१ नें वाढ झाली आहे.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचें नवें डायरेक्टर बोर्ड

### अध्यक्ष व उपाध्यक्ष ग्रामीण भागांतील

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या डायरेक्टर बोर्डाची निवडणूक दिनांक १५ सप्टेंबर रविवार रोजीं पुणें येथें होऊन खालीलप्रमाणें १७ डायरेक्टरांचें नवें बोर्ड निवडून आलें. या निवडलेल्या १७ डायरेक्टरांमध्यें ७ वैयक्तिक भागिदारांतर्फे, ८ जिल्ह्यांतील शेतकी सोसायट्यांतर्फे व २ बिगर शेतकी सोसायट्यांतर्फे, असें निवडले आहेत.

**वैयक्तिक भागिदारांतर्फे**

(१) श्री. नारायण विनायक पांडव (२) श्री. विश्वनाथ जनार्दन करंदीकर (३) श्री. महारुद्र र. तुळशीबागवाले (४) श्री. रामचंद्र यशवंत बोरकर (५) श्री. वासुदेव बळवंत गोगटे (६) श्री. विष्णु त्रिंबक टिळक (७) श्री. रघुनाथ वामन जोशी.

**शेतकी सोसायट्यांतर्फे**

श्री. गो. पां. पवार, पुरंदर, भोर (२) श्री. य. बा. सावंत, हवेली (३) श्री. शं. बा. इनामके, दौंड (४) श्री. द. कृ. काळे, शिरूर (५) श्री. सा. मा. सातारकर, खेड (६) श्री. शि. भि. निंबाळकर, इंद्रापूर (७) श्री. मु. सा. काकडे, बारामती (८) श्री. ह. रा. देवकर, जुन्नर.

**बिगर शेतकी सोसायट्यांतर्फे**

(१) श्री. द. ल. पारखी, पुणें शहर (२) श्री. अ. य. माने, पुणें जिल्हा.

**अध्यक्ष-उपाध्यक्ष दोघेहि ग्रामीण भागांतील**

सायंकाळीं झालेल्या सभेंत बँकेचे अध्यक्ष म्हणून श्री. यशवंतराव सावंत, इनामदार (हवेली) हे निवडण्यांत आले, व उपाध्यक्ष म्हणून श्री. शिवाजीराव भिकुलाल निंबाळकर, (इंद्रापूर) यांना निवडण्यांत आलें.

नवीन निवडण्यांत आलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना असंडपणें मनःपूर्वक सहकार्य देण्याचें आश्वासन शहरी भागातर्फे श्री. गोगटे, श्री. तुळशीबागवाले, श्री. पोतदार, आदि वक्त्यांनीं दिलें व ग्रामीण भागांतर्फे श्री. काकडे, श्री. व्यवहारे, श्री. सूर्यवंशी आदि वक्त्यांची त्यास पूरक अशीं आश्वासनात्मक भाषणें झालीं.

---

**जयपूरबद्दल आग्रह**—राजस्थानची राजधानी कोणती असावी हें ठरविण्यासाठी भारत सरकारनें एक चौकशी-समिति नेमली होती. जयपूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेनें समितीकडे एक निवेदन पाठवून जयपूर येथेंच राज्याची राजधानी व हायकोर्ट असावें असा आग्रह व्यक्त केला आहे. जयपूर शहरांत गेल्या आठ वर्षांत बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या असल्याबद्दल निवेदनांत लक्ष वेधण्यांत आलें आहे.

**साखरेच्या धंद्याला मदत**—बिहारमधील उसाच्या पिकाची सुधारणा करण्यासाठी व साखर कारखान्यांच्या भागाचा विकास करण्याची एक मोठी योजना भारत सरकारनें तयार केली आहे. साखर कारखान्यांच्या भागांत उसाची वहातूक करण्यासाठी ट्रॅमचा मार्ग बांधण्यांत येणार असून त्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें ५० लाख रुपयांचें कर्जहि मंजूर केलें आहे. बिहार सरकारनें योजनेसाठी १·६ कोटी रुपये मंजूर केले आहेत.


# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : मुख्य कचेरी, पुणें २.

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल (भागापोटीं भरलेल्या आगाऊ रकमांसह) | रु. | १०,५०,०००चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८,००,००,०००चे वर |

सेव्हिंग्ज, स्पेशल सेव्हिंग्ज व मुदत ठेवी यावर वाढविलेल्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

स्पेशल सेव्हिंग्ज द. द. अडीच टक्के

—: शाखा :—

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, भिवंडी, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैदराबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर (फलटण गल्ली व मुरारजी पेठ), श्रीरामपूर व ठाणें.

पुण्यांत बँकेच्या इमारतींत व डेक्कन जिमखाना शाखेंतहि सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्था आहे. तिचा जनतेनें फायदा घ्यावा.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## दि पूना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

चेअरमन : विष्णु रामचंद्र गोखले

एजंट : भ. ग. सावणे

गेल्या बारा वर्षांत सभासदसंख्येंतील प्रतिवर्षाची वाढ विचारांत घेतां या वर्षी सर्वांत जास्त सभासदसंख्येंत वाढ झाली असें नमूद करावेसें वाटतें. या वर्षी १२१ नवीन सभासद झाले. पोटनियमांतील तरतुदीस अनुसरून ७७ सभासदांचें सभासदत्व कमी झालें. वर्षाखेरीस सभासद रजिस्टरवर ९५७ सभासद आहेत.

वर्षारंभीं खपलेले भाग १,८५२ होते व खपलेलें भांडवल रु. १,८५,२०० होतें. यामध्यें वट–घट वजा जातां भाग संख्या ५६ नें वाढून खपलेलें भांडवल रु. १,९०,८०० चें आहे.

वसूल भांडवलांतील वाढहि स्पृहणीय अशचि आहे. गतवर्षीचे अखेरीस वसूल भांडवल रु. १,०७,३६० चें होतें. त्यामध्यें रु. १६,७२० ची भर पडून तें वृत्तांताचे वेळीं रु. १,२४,०८० चें झालें आहे.

बँकेंतील या सहकारी वर्षांत ठेवी वाढल्याचें दिसून येईल. ठेवींची उलाढालहि त्याच प्रमाणांत वाढली आहे. ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढती स्पर्धा जाणवत होती. 'कॉल डिपॉझिट' यास विशेष महत्त्व प्राप्त झालें असून 'कॉल डिपॉझिट' वरील व्याजाचा दर व मुदत ठेवीवरील व्याजाचे दर यामध्यें अर्थशास्त्रास अभिप्रेत असलेलें नातें राहिलेलें दिसत नाहीं. खेळती रक्कम जास्तींत जास्त मिळवून आपआपलीं खातीं सुधारण्याचा प्रयत्न होत आहे.

गेलीं कांहीं वर्षें रिझर्व्ह बँकेकडून सुचविल्याप्रमाणें सहकारी खात्यानें कर्ज गुंतवणूकीचें प्रमाण ठेवीशीं साठ टक्के किंवा खेळत्या भांडवलाचें ५० टक्के यापैकीं जें कमी असेल तें, असें ठरवून देण्यांत आलें आहे. या नियमांस मुंबई स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें सुचविलेल्या दुरुस्तीवर अद्याप सहकारी खात्यानें निर्णय घेतला नाहीं. म्हणून उपरोक्त नियमांप्रमाणेंच व्यवहाराचें बंधन पाळावें लागत आहे. कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें ठेवींत डिसेंबर १९५६ मध्यें जी एकदम घट झाली त्याचाहि परिणाम होऊन कर्जवांटप ३।४ महिने बंद ठेवणें भाग पडलें.

या सर्व अडचणीमुळें गरजू सभासदांना बरीच अडचण सोसावी लागली, याबद्दल बोर्ड खेद व्यक्त करीत आहे. उपरोक्त सहकारी खात्याचे निर्बंधामुळें कर्जवांटप मर्यादित करावें लागून प्रथमच कर्ज मागणी करणाऱ्या सभासदांचे अर्ज कांहीं काळ तरी स्थगित ठेवावे लागतील अशी परिस्थिति आहे. ठेवींत सुधारणा झाल्यासच या कोंडींतून बाहेर येण्याचा मार्ग आहे.

थकबाकीचे कर्जव्यवहाराशीं शेंकडा प्रमाण १६ टक्के आहे व तें गतवर्षीपेक्षा एक टक्क्यानें कमी आहे. या वर्षीं रोख्यांतील गुंतवणूक रु. १,४७,४२५ नें कमी झाल्याचें ताळेबंदावरून लक्षांत येईलच. बँकेनें नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् १२ वर्षांपूर्वीं एक लाख रुपयांचीं घेतलीं होतीं. त्याची संपूर्ण दीडलाख रुपये रक्कम सव्याज परत आली. ही रक्कम सरकारी रोख्याचे भाव स्थिर पातळींत नसल्यानें तूर्त कॉलडिपॉझिट म्हणून पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेमध्यें ठेविली आहे.

इन्व्हेस्टमेंटसची किंमत सालोसाल बाजार घसरत असल्यानें कमी होत आहे. त्यासाठी एक फंड नफ्यांतून निर्माण करून त्यांत वर्षाचे सुरवातीस रु. २९,०००।– होते, त्यांत रु. ४०००।– ची भर घातलेली आहे. अद्यापहि तरतुदीची जरूरी आहेच.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वायं. एस. जोशी
मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११.

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फें | रु. २६,००,००० |
| | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. १३,२५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.